# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of missing Child**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **19/09/2022**

**Brief of the work done :-**

'सोशल_मीडिया'चा समाजोपयोगी वापर ; लोहतवाडीतुन हरवलेला मुलगा पो.स्टे. कारंजा शहर पोलिसांनी शोधला.

## व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपची मदत अवघ्या ४ तासात बेपत्ता किशोर वडिलांच्या ताब्यात

### कारंजा शहर पोलिसांचे कौतुकास्पद कार्य

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कारंजा** ▪ यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील लोहतवाडी गावातील १३ वर्षीय किशोर बेपत्ता झाल्याची माहिती मिळताच कारंजा शहर पोलीस ठाण्याने अवघ्या ४ तासात बेपत्ता युवकाचा शोध घेऊन त्याला त्याच्या वडिलांच्या ताब्यात देऊन कौतुकास्पद कामगिरी केली.

तरुण बेपत्ता झाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी या तरुणाचा शोध सुरू केला. दरम्यान, महिला पोलिस कॉन्स्टेबल वंदना यांना १५



सप्टेंबर रोजी दुपारी १२.४५ वाजता कारंजा येथील पोलिस वसाहती समोरील पिंपळाच्या झाडाखाली एक १३ वर्षीय तरुण बसलेला आढळला.

पोलीस हवालदार वंदना यांनी या तरुणाचा फोटो काढून पोलीस स्टेशनच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर टाकून माहिती दिली. ठाणेदार आधारसिंग सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली कारंजा शहर पोलिसांनी ही माहिती बेपत्ता तरुणाचे वडील दिलीप शामराव चव्हाण यांना दिली व त्यांच्याकडे यासंदर्भात माहिती विचारली. तपासाअंती ठाणेदार आधारसिंग सोनोने यांच्या मार्गदर्शन व आदेशानुसार बेपत्ता कुणाल दिलीप चव्हाण याचे वडील दिलीप शामराव चव्हाण यांना कारंजा शहर पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले.

यावेळी किशोरला त्याचे वडील व चुलते रमेश थावरू जाधव यांच्या ताब्यात देण्यात आले. या कामात महिला पोलीस कॉन्स्टेबल वंदना, पोलीस नाईक बिबेकर, पोलीस कॉन्स्टेबल शेरू गारवे यांनी सहकार्य केले. (ता.प्र.)